INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

# संयुक्त महाराष्ट्राची चळवळ आणि दादासाहेब गायकवाड

**डॉ. अविनाश दि. फुलझेले**
इतिहास विभागप्रमखए डॉ. आंबेडकर महाविद्यालय,
दीक्षाभूमी, नागपूर मो. ९८२३०८०५७३
ई—मेल: avi.fulzele@gmail.com

**सारांश :**

महाराष्ट्र राज्याने पुरोगामी राज्याचा नाव लौकिक मिळविला आहे. अशा या महारा ट्राच्या उभारणीला अनेक व्यक्तींचा, संघटनेचा व पक्षांचा भक्कम पाठींबा मिळाला. दादासाहेब गायकवाड व त्यांच्या पक्ष संघटनेने महाराष्ट्राच्या उभारणीत मोठे योगदान दिले आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्याच्या जडणघडणीच्या इतिहासाचे सिंहावलोकन करणे आज गरजेचे आहे. या महान कार्यात स्वत:ला झोकून दिलेल्या व्यक्तींचा, संघटनेचा व पक्षाचा सर्वसामान्यांना विसर पडला आहे. त्यामुळे त्यांच्या कार्यांना आज उजाळा देऊन त्यांच्याबाबत कृतज्ञता व्यक्त करुन व त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव करुन नव्या पिढीसमोर आपल्या पूर्वजांच्या कार्याचा तपशील पुढे ठेवणे गरजेचे आहे. या प्रामाणिक हेतूनेच सदर शोधनिबंध तयार केला आहे.

**कि वर्डस्** : अस्पृश्य, संयुक्त महाराष्ट्र, भाष्यावार राज्य

---

**प्रस्तावना :**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भाषिक तत्वावर प्रत्येक राज्याची पुनर्रचना करण्यात यावी अशी मागणी जोर धरु लागली असे असले तरी १९१७ साली जयपूरच्या प्रा. वि. वि. ताम्हणकर यांनी ‘लोकशिक्षण’ मासिकात हैद्राबाद संस्थान व वऱ्हाड मध्यप्रांत येथील मराठी भाषिकांचा प्रदेश मुंबई राज्यातील मराठी भाि ाक जिल्हयांना जोडावा अशी कल्पना प्रथम मांडली होती.[१] पुढे मराठी भाि ाक असलेल्या विदर्भातून स्वतंत्र विदर्भाची मागणी होऊ लागली. त्यासाठी ऑगस्ट १९४० मध्ये विदर्भातील कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांनी ‘महाविदर्भ सभा’ स्थापन करुन स्वतंत्र विदर्भासाठी चळवळ सुरु केली.[२] बेळगाव येथे १९४६ साली भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी महाराष्ट्राची मागणी करणारा ठराव पारित केला. या ठरावानुसार दत्तो वामन पोतदार, शंकरराव देव, केशवराज जेधे, श्री श. नवरे, ग. त्र्यं. माडखोलकर यांची समिती स्थापन करण्यात

INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

आली.[३] पुढे २८ जुलै १९४६ मध्ये विदर्भ, मराठवाडा आणि मुंबईसह संयुक्त महारा  ट्राच्या उभारणीसाठी महारा ट्रातील कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांनी संयुक्त महाराष्ट्र परि  दिेची स्थापना करुन चळवळ सुरु केली.[४] याच काळात नागपूरचे मराठा समाजाचे विद्वान पुढारी श्री गोपाळराव दळवी यांनी २३/६/४६ च्या तरुण भारतात ''महाराष्ट्रातील कुणबी, माळी, तेली, को  टी, अस्पृश्य, कलार, भंडारी यांनी आपण सर्व मराठे आहोत असे समजून मराठा या सदराखाली संघटित व्हावे.''[५] असे आवाहन केले.

**संशोधन पद्धती** :

ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करून उपलब्ध साहित्याचा शास्त्रीय दृष्टीने परिक्षण करून मुल्यमापन केले गेले.

**गृहीत तत्त्वे** : दादासाहेब गायकवादांचा संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीत मोलाचा वाटा होता.

**दादासाहेबांचा संयुक्त महाराष्ट्र चळवळींतील सहभाग :**

मुंबई प्रांतात शेडयुल्ड कास्ट फेडरेशन ही महत्वाची संघटना तळागाळातील लोकांचे प्रश्न हाती घेऊन लढत होती. डॉ. आंबेडकर आणि दादासाहेब गायकवाडांनी या संघटनेच्या मार्फत महारा ट्रात अनेक लहान—मोठे लढे उभारुन दलितांच्या संघटित शक्तीचा परिचय दिला होता. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर हया संघटनेला डावलून आंदोलन उभे करणे शक्य नाही याची जाणीव संयुक्त महाराष्ट्र समितीच्या नेत्यांना झाली होती. म्हणूनच १९४६ च्या ऑगस्टमध्ये डॉ. आंबेडकरांना भेटण्यासाठी श्री. माडखोलकर आणि मुंबईतील मुख्य कार्यकर्ते श्री. श्रीपादराव नवरे, सिध्दार्थ कॉलेजमध्ये गेले होते. तेव्हा ''माझ्या कानावर जशी ही गोष्ट घातली तशी नाशिकला जाऊन दादासाहेब गायकवाडांच्या कानावरही गोष्ट घाला.''[६] असे समितीच्या लोकांना डॉ. आंबेडकरांनी सुचविले.

सन १९५२ च्या सार्वजनिक निवडणुकीत **शे. का. फे** पक्षाला पराभवाचा सामना करावा लागला. त्यामुळे त्यातून समविचारी पक्षाशी सहकार्य करण्याचा विचार पुढे येऊ लागला. विदर्भ राज्याची निर्मिती ही संयुक्त महारा  ट्राच्या मागणीतील मोठा अडथळा होता. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्रवाद्यांनी विदर्भवाद्यांना काही सवलती देण्याचे मान्य करुन त्याप्रमाणे त्यांच्याशी २८ सप्टेंबर १९५३ रोजी 'नागपूर करार' केला.[७] त्यामुळे संयुक्त महारा ट्राच्या निर्मितीचा मार्ग प्रशस्त झाला. याच कालावधीत **शे. का. फे** या पक्षाने संयुक्त महारा ट्र समितीत सहभागी होण्याच्या हालचाली सुरु केल्याची असल्याची जाणीव तत्कालीन पत्रव्यवहारातून होते.[८] १०

INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

ऑक्टोबर १९५५ ला राज्यपुनर्रचना आयोगाचा अहवाल प्रसिध्द झाला. त्यात मुंबईसह महाराष्ट्राची मागणी आयोगाने फेटाळली होती. त्यामुळे १० ऑक्टोबर १९५५ ला दादासाहेबांनी 'काळा दिवस' म्हणून त्यांची गणना केली.[९] पुढे केन्द्र सरकारने मुंबई शहराला केन्द्रशासित प्रदेशाचा दर्जा देऊन बाकीच्या प्रदेशाचा संयुक्त महाराष्ट्र होईल असा आपला निर्णय १६ जानेवारी १९५६ रोजी जाहीर केला. या निर्णयाचा कडाडून विरोध करताना डॉ. आंबेडकर म्हणाले होते की, ''मला हे सांगा मुंबईच्या लोकापेक्षा राजकीयदृ टया श्रे ठ असे लोक उभ्या हिंदुस्थानात कुठे आहेत ? आणि त्यांना म्हणे तुम्ही मध्यवर्ती नियंत्रणाखाली आणणार ? कोणता महारा ट्रीय आणि कोणता मुंबईतील स्वाभिमान असलेला माणूस हा अपमान सहन करील. मुंबईतील लोकांची दिल्लीतील किंवा मणिपूरमधील लोकांची तुम्ही तुलना तरी करु शकला काय ?''[१०] तेव्हा अशा बिकटप्रसंगी **शे. का. फे.** पक्षाने कोणती भूमिका घ्यावी यासंबंधी दादासाहेबांनी डॉ. आंबेडकरांकडे विचारणा केली. त्यावर डॉ. आंबेडकरांनी दादासाहेबांना कळविले की, ''...स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभारच बंद पाडण्यास सरकारला भाग पाडावे...''[११] त्यानुसार दादसाहेबांनी हालचाली करुन **शे**.का.फे. पक्षाने एक ठराव पारित करुन आपल्या मुंबई महापालिकेच्या सर्व सभासदांना मुंबईला केन्द्रशासित प्रदेशाचा दर्जा दिल्याच्या निषेधार्थ राजीनामे देण्याचा आदेश दिला.[१२] केन्द्र सरकारने घेतलेल्या निर्णयाचा विरोध करतांना डॉ. आंबेडकर राज्यसभेत म्हणाले की, ''देशाच्या ऐक्यासाठी उत्तरप्रदेशाचे तीन, बिहारची तीन व मध्यप्रदेशाची दोन राज्ये करावी. मुंबई हराचेही स्वतंत्र राज्य करावे आणि मराठवाडयाचे सुध्दा वेगळे राज्य करावे. पण सरकार मुंबईला निकोबारचा दर्जा देऊ पाहत आहे. म्हणून मी माझा पवित्रा बदलवून इतर महाराष्ट्रीयांबरोबर या प्रश्नावर झुंज देईल...''[१३] या डॉ. आंबेडकरांच्या वक्तव्यावरुन ते समितीत सहभागी होणार असे संयुक्त महाराष्ट्र समितीच्या लोकांना वाटू लागले. याच काळात नाशिक – इगतपूरी विधानसभेची पोटनिवडणुक झाली. या पोटनिवडणुकीत संयुक्त महारा ट्रवादी स्वतंत्र उमेदवार श्री. पांडुरंग महादेव मुर्कुटेनी दादासाहेबांचा पराभव केला.[१४] त्यामुळे संयुक्त महाराष्ट्र समितीची खरी ताकद दादासाहेबांनाही अनुभवता आली. याच सुमारास प्रबोधनकार के. सी. ठाकरे यांनी, 'जय महाराष्ट्र' या मराठी साप्ताहिकाच्या दिनांक २५/७/५६ च्या अंकात डॉ. आंबेडकरांना उद्देशून महाराष्ट्राचे नेतृत्व स्वीकारण्याचे आवाहन करणारे विनंतीपत्र जाहीर केले.[१५] संयुक्त महाराष्ट्र समितीने १९५७ ची सार्वत्रिक निवडणूक

INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

लढविण्याचा निर्णय घेतल्याने समितीच्या कार्याला अधिकच जोर चढला. यानिमित्याने सर्व घटक पक्षांचा यात सहभाग असावा यावर चर्चा करण्यासाठी संयुक्त आघाडीच्या कार्यकर्त्यांची एक सभा मुंबई येथे घेण्यात आली. या सभेकरिता श्री. एस. एम.जोशी यांनी दादासाहेबांना तार करुन फेडरेशनचे प्रतिनिधी म्हणून बोलविले होते.[१६] या बैठकीत दादासाहेबांनी **शे. का. फे**. या पक्षाला राखीव जागेव्यतिरिक्त प्रत्येक जिल्हयात एक जनरल जागा द्यावी अशी समितीच्या लोकांकडे मागणी केली. आगामी निवडणुकीच्या सहकार्याबाबत विस्तृत चर्चा समितीच्या लोकांसोबत करण्यासाठी नोव्हेंबर १९५६ मध्येच दिल्ली येथील डॉ. आंबेडकराच्या निवासस्थानी एक बैठक घ्यावी असे डॉ. आबेडकरांनी दादासाहेबांना कळविले.[१७] त्याप्रमाणे दिल्ली येथे बैठक होऊन संयुक्त महाराष्ट्र समितीने **शे. का. फे.** चे उमेदवार जनरल जागेवर उभे करुन निवडूण आणावेत, सर्व राखीव जागा **शे. का. फे.** द्याव्यात, समितीने खेडयापाडयात अस्पृश्यांवर होणाऱ्या अन्यायाचे निवारण करावे. या **शे. का. फे.** पक्षाच्या सर्व अटी समितीच्या नेत्यांनी मान्य केल्या.[१८] पुढे डॉ. आंबेडरांनी संयुक्त महारा ट्र समितीच्या आंदोलनावि यी वेळोवेळी कोणती भूमिका घ्यावी याचे सर्व अधिकार दादसाहेबांकडे सोपविले.[१९] त्यानंतर ३० नोव्हेंबर १९५६ रोजी **शे**. का. फे. पक्ष रीतसर सयुंक्त महाराष्ट्र समितीत दाखल झाला.[२०] त्या वेळी सयुंक्त महाराष्ट्र समितीचे नेतृत्व कॉ. डांगे, एस. एम. जोशी, प्र. के. अत्रे, केशवराव जेधे, ना. ग. गोरे, दत्ता देशमुख इत्यादी नामवंत मंडळी करीत होती. यातील कम्युनिस्ट पक्षाची कामगारांच्या संघटनेवर मजबूत पकड होती. त्यामुळे संबंध कामगार वर्गाने या लढयाला मोठा हातभार लावला; पण दादासाहेबांच्या नेतृत्वाखाली जेव्हा आंबेडकरी समाज या लढयात उतरला तेव्हा दादासाहेबांनी ठिकठिकाणी दौरे काढून दलितांची ताकद संयुक्त महारा ट्र समितीच्या बाजुने उभी केली.

संयुक्त महारा ट्रासाठी उभारलेल्या लढयाचे व आगामी निवडणुकीत एकजुटीने घ्यावयाच्या निर्णयासाठी श्री. एस. एम. डांगे हयांच्या अध्यक्षतेखाली ११ सभासदांचे एक चिटणीस मंडळ निवडले गेले. त्यात दादासाहेबांचा सभासद म्हणून सहभाग होता.[२१] मुंबईसह संयुक्त महारा ट्र उभा राहावा यासाठी प्रत्येक मराठी माणूस पेटून उठला होता. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेपासून लोकसभा, विधानसभेच्या १९५७ मधील निवडणुकीत कॉंग्रेस पक्षाला मोठा पराभव पत्करावा लागला. तोपर्यंत कॉंग्रेस पक्षाला निवडणुकीत पराभव माहीत नव्हता; पण संयुक्त महाराष्ट्र समितीच्या

I J R S S I S, Vol. V, January 2017: 222-229 ISSN 2347 – 8268
INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

निमित्ताने कॉंग्रेसला विरोध करणारा एक प्रभावी विरोधी गट निर्माण झाला. सन १९५७ च्या निवडणुकीत **शे. का. फे.** पक्षाच्यावतीने सर्वसाधारण जागेवरुन दादासाहेब गायकवाड आणि ॲड. बी. सी. कांबळे हे कॉंग्रेस उमेदवारांचा पराभव करुन निवडून आले[२२] आणि आपले समितीतील अस्तित्वही सिध्द केले. पुढे **शे. का. फे.** पक्ष बरखास्त करुन विशाल ध्येय असलेल्या रिपब्लिकन पक्षाची स्थापना करण्यात आली. संयुक्त महारा ट्राची चळवळ ही संकुचित प्रांतवादी चळवळ नसल्याची जाणीव रिपब्लिकन पक्षाला असल्याने हा नवा पक्षही संयुक्त महारा ट्राच्या चळवळीत सामील झाला. [२३] आणि दादासाहेबांच्या नेतृत्वात समितीच्या पाठीमागे भक्कमपणे उभा राहिला.

संयुक्त महारा ट्राच्या लढयाच्या निमित्याने छोटे छोटे पक्ष समितीत सामील झाले होते. हे सर्व पक्ष वेगवेगळया जाती, गटांचे नेतृत्व करणारे होते. तेव्हा या संधीचा दादासाहेबांनी फायदा घेवुन जातीयवादाची पाळेमुळे न ट करुन नवा महाराष्ट्र उभा करता यावा आणि मराठी माणूस एकजीवी होवुन परस्परांशी बंधुभावाने वागावा यासाठी ‘एक गाव एक पाणवठा’ असा कार्यक्रम क्रांतीसिंह नाना पाटलांच्या सहकार्याने दादासाहेबांनी हाती घेतला. [२४] पुढे रिपब्लिकन पक्षात फूट पडून दुरुस्त व नादुरुस्त असे दोन गट निर्माण झाले. दुरुस्त गटाने समितीच्या कामकाजातून आपले अंग काढून घेतले. समाजवादी महारा ट्र निर्माण करणे हा संयुक्त महारा ट्र समितीचा उद्देश होता.[२५] या उद्देशपूर्तीसाठी दादासाहेबांच्या नेतृत्वाखालील नादुरुस्त गटाने समितीच्या कार्याला सहकार्य देण्याचे धोरण पुढे चालूच ठेवले. तेव्हा दुरुस्त पक्षाने दादासाहेब गायकवाडांवर कम्युनिस्ट धार्जिणे असल्याचा आरोप लावला. त्यावर दादासाहेब म्हणाले की, ‘‘....मी एक वेळ कम्युनिस्टांना पचवीन पण कम्युनिस्ट मला पचवू **श**कणार नाहीत...’’[२६] अशाप्रकारे सर्व आरोपांचे खंडन करुन त्यांनी समितीच्या कार्याला आपले पूर्ण सहकार्य सुरुच ठेवले.

संयुक्त महारा ट्र समितीच्या कार्याला पुढे यश येऊन १ मे १९६० रोजी मुंबईसह महारा ट्राची निर्मिती करण्यात आली. त्या वेळी यशवंतराव चव्हाण यांनी संयुक्त महारा ट्र मिळविण्यासाठी स्वत: ‘दाई’ ची भूमिका वठविण्याचे बोलून दाखविले होते. तेव्हा यावर दादासाहेबांनी ‘‘तुम्ही जर संयुक्त महारा ट्राचे दाईपन केलेत तर संयुक्त महारा ट्राचा बाप कोण ?’’[२७] असा रोखठोक प्रश्न विचारला होता. मुंबईसह महारा ट्राची निर्मिती झाली असली तरी मराठी भा िक बेळगाव, कारवार, डांग हा भाग महारा ट्रात सामील केला नव्हता. तेव्हा मुंबई राज्य पुनर्रचना बिलावर लोकसभेत

INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

बोलतांना दादासाहेब म्हणाले होते की, ‘‘... भा ाावार प्रांतरचनेच्या मुळाशी त्या त्या प्रांतभाषेचे अधि ठान असते. असे जर असेल तर महारा ट्राची निर्मिती करतांना हे तत्व तंतोतंत पाळण्यात आलेले आहे असे वाटत नाही. महारा ट्राचा बराच भूभाग नवमहारा ट्रातून वगळण्यात आला. १९५६ साली भा ाावार प्रांतरचनेच्या मसुद्याने व सल्लागार समितीच्या सूचनेनुसार ‘डांग’ जिल्हा महारा ट्राला जोडण्यात आला. डांग हे महारा ट्राचे उपअंग आहे हे सत्य असतांना देखील महारा ट्राच्या कोंदणात बसलेला म्हणजेच डांग जिल्हा महारा ट्रापासून हिरावून घेऊन गुजरात राज्याला जोडण्यात येतो ही किती विक्षिप्त गो ट आहे...’’[२८] अशाप्रकारे दादासाहेबांनी संयुक्त महारा ट्रबद्दलची आपली भूमिका विशद करुन संपूर्ण मराठी भाषिक प्रदेश महारा ट्रात सामील करुन घेण्याविषयी हालचाल करावी अशी सदनाला विंनती केली.

महाराष्ट्र राज्यनिर्मितीनंतर बराच मराठी भाषिक प्रदेश महारा ट्रात सामील झाला नव्हता. असे असताना देखील आता समितीचे विसर्जन करण्यात यावे असा विचार समितीतील काही घटक पक्षाने पुढे मांडला. तेव्हा त्यावर दादासाहेब म्हणाले होते की, ‘‘...महाराष्ट्र मिळावावा हाच एकमेव उद्देश कुणी समजोत पण समितीचा हा उद्देश आम्ही दुय्यम समजतो. राष्ट्रकल्याण साधणारा व साधवून घेणारा मजबूत असा विरोधी पक्ष आमच्या नजरेत समितीचा उद्देश आहे. या उद्देशाने वागलो तर राज्य घेऊ नाही तर सत्ताधाऱ्यांवर धाक ठेवून लोककल्याण व राष्ट्रकल्याण करवून घेवू...’’[२९] असे विशाल ध्येय समितीबद्दल दादासाहेबांचे असल्याने त्यांनी समितीच्या विसर्जनाला कसून विरोध केला. पण समितीच्या घटक पक्षांत या मुद्दयावर जास्त मतभेद निर्माण झाल्याने शेवटी दादासाहेबांनी समितीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. समितीच्या संपूर्ण कार्यकाळात दादासाहेबांनी दलित, कष्टकऱ्यांना या आंदोलनात सहभागी करुन घेतले. त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडून त्यांच्या प्रगतीचा मार्ग प्रशस्त केला. हा त्यांच्या समितीच्या कार्यातील महत्वपूर्ण सहभाग होता.

## मुल्यांकनः

आज संयुक्त महाराष्ट्राची ५० वर्षाच्या वर वाटचाल झाली आहे. या समग्र कालखंडाचा बारकाईने अभ्यास केला तर आपल्या असे लक्षात येईल की डॉ. आंबेडकर व दादासाहेब गायकवाड यांना अभिप्रेत असलेला समन्यायी विकासाचा टप्पा महाराष्ट्र गाठू ाकला नाही. दिवसेंदिवस प्रादेशिक असमतोल वाढतच आहे. ज्या विकासाच्या कारणासाठी विदर्भवाद्यांनी स्वतंत्र विदर्भाचा मुद्दा सोडून ‘एक भाषिक’ राज्यासाठी

INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org

आपली भूमिका बदलविली; परंतु विकासाचा महामेरु त्यांच्यापर्यंत अजूनपर्यंत पोहचलाच नाही. तेव्हा अशा परिस्थितीत दादासाहेब गायकवाड हयात असते तर त्यांनी निश्चितच आपला पवित्रा बदलवून मागासलेल्या प्रदेशाचे प्रश्न हाती घेऊन लढा उभारला असता. तेव्हा त्यांना आपला आदर्श मानून नवे नेतृत्व विदर्भ राज्यासाठी उभे करणे निकडीचे झाले आहे आणि त्यासाठी 'एक भाषिकत्वा' चे जू विदर्भातील लोकांनी फेकून देऊन डॉ. आंबेडकर व दादासाहेबांना अभिप्रेत असलेल्या विकास मार्गाने वाटचाल करणेच आवश्यक आहे. यासाठी आज तरी स्वतंत्र विदर्भाशिवाय दुसरा पर्याय दिसत नाही.

**संदर्भ सूची :**


१) फडके, डॉ. य. दि.,'केशवराव जेधे' श्रीविद्या प्रकाशन पुणे, प्र. आ.,१९९२, पृ. २४६

२) खैरमोडे, चां.ग., 'डॉ. भीमराव रामजी आंबेडकर', खंड १० वा, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि ासंस्कृती मंडळ मुंबई, प्र. आ. १९८९, पृ. ५४

३) परदेशी, प्रतिमा, 'योध्दा जनसत्याग्रही दादासाहेब गायकवाड', 'दिग्नाग प्रकाशन पुणे, प्र. आ., २००२, पृ. ५५

४) खैरमोडे, चां.ग., 'डॉ. भीमराव रामजी आंबेडकर', खंड १० वा, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि ासंस्कृती मंडळ मुंबई, प्र. आ. १९८९, पृ. ५४

५) शेंडे, निशिकांत, मेश्राम वा. ना. (संपा. ), 'दलितांचे जग : वेदना आणि शि टाई', सुनील प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर, दु. आ., १९७८, पृ. ३८

६) डांगळे, अर्जुन (संपा.), 'कर्मवीर दादासाहेब गायकवाड, 'लोकराज्य विशे ांक', माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन प्रकाशन मुंबई, ऑक्टोबर २००१, पृ. ८

७) खैरमोडे, चां.ग., 'डॉ. भीमराव रामजी आंबेडकर', खंड १० वा, महारा ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, प्र. आ. १९८९, पृ. ५४

८) श्री. बी. सी. कांबळे यांचे भाऊराव गायकवाड यांना पत्र दिनांक २०/८/१९५४, रमेश शिंदे यांच्या खाजगी संग्रह, मुंबई.

९) लोखंडे, हि. गो. (संपा.), 'कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांची भा ाणे, खंड १ ला, कर्मवीर दादासाहेब गाकयवाड मेमोरियल फाऊंडेशन, उल्हास नगर, प्र. आ., १९९३, पृ. ११७.

१०) जनता, मुंबई, शनिवार २८ जानेवारी १९५६, वर्ष १९, अंक ३९, पृ. १

११) खरात, शंकरराव (संपा.), 'कर्मवीर भाऊराव कृ णराव ऊर्फ दादासाहेब गायकवाड यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रे', ठोकळ प्रकाशन पुणे, प्र. आ., १९६१, पृ. ३४१

१२) पेंडसे लालजी, 'महारा ट्राचे महामंथन', साहित्य सहकारी संघ प्रकाशन मुंबई, प्र. आ., १९६५, पृ. ४०

१३) कित्ता, पृ. ४३१

१४) कित्ता, पृ. ४४१

१५) प्रबुध्द भारत, मुंबई, ानिवार ४ ऑगस्ट १९५६, वर्ष १ ले, अंक २४, पृ. ५

I J R S S I S, Vol. V, January 2017: 222-229 ISSN 2347 – 8268

INTERN ATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.659/13(N)
www.vmsindia.org


१६) भाऊराव गायकवाडांचे डॉ. आंबेडकरांना पत्र दिनांक २१ ऑक्टोबर १९५६, रमेश शिंदे यांचा खाजगी संग्रह, मुंबई.

१७) प्रबुध्द भारत, मुंबई, शनिवार ता. १० नोव्हेंबर १९५६, वर्ष १ ले, अंक अंक ३६, पृ. १

१८) खरात, ंकरराव (संपा.), 'कर्मवीर भाऊराव कृष्णराव ऊर्फ दादासाहेब गायकवाड यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रे', ठोकळ प्रकाशन पुणे, प्र. आ., १९६१, पृ. ३४३

१९) डांगळे (संपा.), 'क. दा. गा. लो. बि.' पृ. १२

२०) पेंडसे, 'म. म.', पृ. ५४९

२१) कित्ता, पृ. ५५२

२२) वाघ, विलास (संपा.), 'रिपब्लिकन खासदाराकडून दलित जनतेच्या अपेक्षा', सुगावा प्रकाशन पुणे, प्र. आ. १९९९, पृ. १

२३) वाघ, चंद्रमोहन, 'एका कर्मवीराची कहाणी', अभ्युदय प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. १९७२, पृ. ३५

२४) साळवे, दिनकर, '१९५६ नंतरची दलित चळवळ', दिग्नाग प्रकाशन पुणे, प्र. आ., १९९८, पृ. ८

२५) लोखंडे (संपा.), 'क. दा. गा. या. भा.' खंड १, पृ. ९७

२६) कित्ता

२७) पिपलायन, मधुकर (संपा.), 'धर्मज्योती, पद्मश्री दादासाहेब गायकवाड गौरव विशे ंक', पुणे, १५ ऑक्टोबर १९६८, पृ. २६

२८) लोखंडे (संपा), 'क. दा. गा. या. भा.', खंड १, पृ. ७२—७४

२९) कित्ता, पृ. ९१


,,,,,,